सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वनविभाग

# संरक्षित क्षेत्राबाहेरील

# वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत उपाययोजना

# स्थायी आदेश क्रमांक - ००१

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव ), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव ),

महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

# संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत उपाययोजना

**स्थायी आदेश क्रमांक - ००१**

# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

## स्थायी आदेश क्रमांक ००१ (सुधारणा वर्ष २०१५)

## संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत उपाययोजना

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०७ लक्ष हेक्टर आहे. त्यापैकी वनक्षेत्र ६३ लक्ष हेक्टर आहे. हे वनक्षेत्र वन आणि महसूल विभाग यांच्या ताब्यात अनुक्रमे ५५ लक्ष व ८ लक्ष हेक्टर आहे. या वनामध्ये आणि वनाबाहेर वेगवेगळया वन्यप्राणी प्रजातींचा निवास आहे. वनांचा -हास होत असल्यामुळे वन्यप्राण्यांच्या निवास व संरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच समाजातील काही लोक वन्यप्राण्यांची शिकार करून त्यांचे मांस,कातडी, शिंगे इत्यादि वस्तूंची अवैध तस्करी/व्यापार करीत आहेत. या सर्व बाबींवर मात करण्यासाठी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांची निर्मिती करण्यात आलेली आहे. वन खात्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापनासाठी १९८४ या वर्षापासून वेगळा वन्यजीव विभाग कार्यरत आहे. संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या, विशेषत: वाघ या सर्वात महत्वाच्या वन्यप्राण्याच्या संख्येत घट होत चालली असून जर याबाबत योग्य उपाययोजना केली गेली नाही तर या क्षेत्रातील वाघ आणि त्याच्यासोबत इतर वन्यप्राणी लुप्तप्राय होतील व त्याचा दुष्परिणाम निश्चितच पर्यावरणावर होवुन त्यामुळे वनांची प्रत व वनसंवर्धनाचीही मोठया प्रमाणावर हानी होण्याची शक्यता आहे.

अशा क्षेत्रात वन्यजीवांची संख्या कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे या भागांत वन्यजीवांचे संरक्षण तसेच त्यांचे आश्रयस्थळ व परिसराच्या योग्य संवर्धनासाठी पुरेशी उपाययोजना व प्रयत्नांची कमतरता हे होय. संरक्षित क्षेत्रात ज्या पध्दतीने वन्यजीवांसाठी आश्रयस्थळ व पाणस्थळांचा विकास तसेच त्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजना केल्या जातात, त्या पध्दतीची कार्यवाही या क्षेत्राबाहेर केली जात नाही. संरक्षीत क्षेत्राबाहेर वन्यजीवांना अवैध शिकारी, अधिवास क्षेत्राचा -हास, चारा व पाण्याची कमतरता यासारख्या मोठया अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामुळे याचा भयंकर परिणाम त्यांच्या प्रजनन व संवर्धनावरही होतो. अवैध शिकार वा अपुरे प्रजनन याचा दुष्परिणाम म्हणून त्यांची संख्या भयावह वेगाने रोडावत आहे. अशा परिस्थितीत वने व वन्यजीवांचे संरक्षण तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्याचे दृष्टीने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. यापुढे या कामासाठी संरक्षीत क्षेत्रात नेमलेले सर्व मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उपवनसंरक्षक व सहायक वनसंरक्षक वन्यप्राण्यांना संरक्षीत क्षेत्राबाहेर संरक्षण देण्यासाठी प्रादेशिक कामावर नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांना वन्यप्राणी व त्यांचे अधिवास वाचविण्यासाठी उद्युक्त करतील व तांत्रिक दृष्टीकोनातून वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करतील.

राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ४७ अभयारण्ये व ४ संवर्धन राखीव क्षेत्र अशी एकूण ५७ संरक्षित क्षेत्र अधिसूचित करण्यात आली असून त्यांचे एकूण क्षेत्र १००५१.५२९ चौ.कि.मी. (राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३.२६ टक्के) आहे. राज्यातील १९ संरक्षीत क्षेत्रांचा (५ राष्ट्रीय उदयान व १४ अभयारण्य) समावेश करून मेळघाट, पेंच, ताडोबा-अंधारी, सहयांद्री, नवेगांव-नागझिरा आणि बोर असे ६ व्याघ्र प्रकल्प आहेत. राज्यातील संरक्षीत क्षेत्रांची यादी परिशिष्ट-१ मध्ये दिलेली आहे.

अन्न साखळीमध्ये वाघ हा सर्वोच्च स्थानी असून संरक्षित व स्वस्थ पर्यावरणाचा तो प्रतिक आहे म्हणून जगात जीवन कायम ठेवण्यासाठी त्याला संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान यांच्या मदतीने भारतीय वन्यजीव संस्थेने वर्ष २००६ मध्ये देशात नविन सुधारीत पध्दतीने प्रगणना केली आहे. प्रगणना वर्ष २०१० मध्ये केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या सूचनेनुसार भारतीय वन्यजीव संस्थेने दि. २८ मार्च २०११ रोजी निष्कर्ष जाहीर केला त्यानुसार महाराष्ट्रात किमान १६०, कमाल १९६ आणि सरासरी

१६९ वाघ आढळून आले आहेत. वर्ष २०१४ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अहवालानुसार राज्यात १९० वाघांचे अस्तित्व आढळून आले आहेत. मागील ८ ते १० वर्षापासून संरक्षित क्षेत्रातील वाघांची जवळपास संख्या स्थिर आहे. परंतू संरक्षित क्षेत्राबाहेरील वनक्षेत्रातील वाघांच्या उपस्थितीचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत असुन वाघासह इतर सर्व वन्यप्राण्यांचे संरक्षण व संवर्धनावर भर देणे संरक्षित क्षेत्राच्या बाहेर सुध्दा गरजेचे आहे.

संरक्षित क्षेत्राबाहेरील इतर क्षेत्रात वन विभाग व वन विकास महामंडळ यामध्ये वनसंवर्धनासाठी जे अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत, ते वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनाबाबत विशेष लक्ष पुरवू शकत नाहीत. शासन निर्णय क्रमांक-डब्ल्युएलपी-०६१३/प्र.क्र.१९९/फ-१, दिनांक २१ जुलै, २०१३ व मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेले आदेश क्र.२३ (४)/प्र.क्र.४९४/१६०३, दिनांक २६ जुलै, २०१३ अन्वये वन्यजीवांचे संरक्षण व शिकार प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी वनाधिका-यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. (परिशिष्ट-२ व ३) तसेच जेथे जेथे रानडुकरांच्या संख्येमध्ये जास्त वाढ झालेली आहे व पिक नुकसानी करित आहे, तेथे त्याचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-२३(३)/२८९९ दिनांक २८.०१.२००२ अन्वये करावयाच्या उपाययोजनांबाबत सुचना जारी करण्यात आल्या आहेत.

वन्यजीवांचे प्रमाण संरक्षित क्षेत्राबाहेर देखील मोठया प्रमाणावर असल्याने त्यांच्या संरक्षणाचे महत्व लक्षात घेवून प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडून सन २००१ या वर्षात "संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांच्या सरंक्षणाबाबत उपाययोजना" हया शिर्षाखाली स्थायी आदेश क्रमांक ००१ निर्गमित करण्यात आले होते. सदरहू आदेश निर्गमित होवून जवळजवळ १४ वर्षे म्हणजे एक तपाहून जास्त वर्षाचा कालावधी लोटला आहे. दरम्यानच्या काळात वन्यजीव व्यवस्थापनाबददल बरेचसे बदल घडून आले असून त्यावेळेस क्षेत्रिय स्तरावर कार्य करणारे कर्मचारी/अधिकारी पदोन्नतीने वरिष्ठ पातळीवर कार्य करीत आहेत. त्यांची जागा क्षेत्रीय पातळीवर नव्याने नियुक्ती झालेली कर्मचारी/अधिकारी यांनी घेतली असल्याने त्यांचे माहितीसाठी व कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या उजळणीसाठी पुन्हा नव्याने सुधारित स्थायी आदेश काढण्याचा मानस सर्वोच्च पातळीवर व्यक्त होत होता. त्या दृष्टीने सन २००१ मध्ये काढण्यात आलेला स्थायी आदेश क्र.००१ मध्ये सुधारणा करुन संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत उपाययोजना बाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**१. प्रादेशिक वन अधिका-यांनी त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रात, वन्यजीवांचे संरक्षण व अवैध शिकार प्रतिबंधक उपाययोजना अंमलात आणणेसाठी खालील सूचना देण्यात येत आहे.**

**१.१ वन्यजीव संरक्षणाकरीता वार्षिक संरक्षण आराखडा तयार करणे.**

वन्यजीव संरक्षणाचे काम प्रभावीपणे करण्यासाठी वनपरिक्षेत्रनिहाय माहिती संकलन करुन उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी विभाग स्तरावर विशेष करुन पावसाळा व उन्हाळयातील गस्तीकरीता वार्षिक वन्यजीव संरक्षण आराखडा तयार करुन वरिष्ठ कार्यालयास करावे. क्षेत्रीय स्तरावर वन्यजीव संरक्षण आराखडयाप्रमाणे संरक्षण विषयक कार्याची अमंलबजावणी होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**१.२ वन्यजीव संरक्षणाकरीता क्षेत्रीय अधिका-यांनी दक्षता घेणे.**

वन्यप्राण्यांच्या संवर्धन व संरक्षणाच्या संदर्भात वनरक्षकापासून सर्व वरिष्ठ कर्मचारी व अधिकारी त्यांच्या दैनंदिन कर्तव्यात नेहमीच दक्ष राहतील तसेच वन्यप्राण्यांच्या संवर्धन व संरक्षणाबाबत आवश्यक उपाययोजना करतील. सर्व संभाव्य व अस्तित्वात असलेले वन्यजीव परिसराचे संवर्धन व विकासाची तसेच

संरक्षणाची जबाबदारी लक्षात घेवून अवैध शिकारी संबंधी व घडलेल्या कुठल्याही घटनांची माहिती वरिष्ठांना त्वरीत कळवतील. पदनिहाय देण्यात आलेली कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

### १.२.१ वनरक्षकांची कर्तव्ये:-

वन्यजीव संरक्षणाच्या संदर्भात वनरक्षक हा एक प्रमुख घटक असून सर्व गुन्हयांची वन्यजीव विषयक प्राथमिक माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन वेळीच वन गुन्हयावर नियंत्रण सुध्दा करता येवू शकेल. याबाबत खालीलप्रमाणे वनरक्षकांनी कृती करणे आवश्यक आहे.

१) वनरक्षकांनी त्यांच्या अधिनस्त सर्व वनक्षेत्राची व सर्व पाणस्थळांची माहिती त्यांच्या क्षेत्रामध्ये फिरुन प्राप्त करावी.

२) त्याच्या बिटामध्ये आढळणा-या सर्व प्रमुख वन्यप्राण्यांची माहिती करुन घ्यावी व कुठल्या क्षेत्रामध्ये कोणते प्राणी जास्त प्रमाणावर आहेत याचा नियमित आढावा स्वत: फिरुन व स्थानिक लोकांकडून घ्यावा.

३) वन्यजीव विषयक अपराधाचा इतिहास असणा-या संशयित गुन्हेगारांची माहिती ठेवावी तसेच त्यांच्या हालचालीवर सुध्दा बारीक लक्ष ठेवावे.

४) वनक्षेत्रामधून जात असलेल्या विद्युत वाहिन्यांजवळ, अवैध विद्यूत प्रवाहाने वन्यप्राण्यांच्या हत्या अलीकडे मोठया प्रमाणार होवू लागल्याने वनरक्षकांनी आपल्या क्षेत्रातील सर्व विद्युत वाहिन्या जात असलेल्या क्षेत्रांची नियमित तपासणी करावी. रात्रीच्या वेळेस गस्त करीत असतांना अशा क्षेत्राची माहिती वनरक्षकांच्या स्वत:च्या सुरक्षिततेसाठी सुध्दा उपयुक्त ठरेल.

५) पोलीस पाटील यांचेसोबत समन्वय ठेवून मुसाफीर रजिस्टर नियमित तपासावे. आठवडी बाजार, भटक्या लोकांचे तांडे इत्यादी ठिकाणी भेटी देवून त्यांची ओळख तपासावी व कुठल्याही परिस्थितीत शिकारी टोळयांचे लोक वास्तव्य करणार नाही याबाबत दक्ष रहावे.

६) वन्यजीवांचे अपराधाकरिता संवेदनशिल असलेल्या क्षेत्रात नियमित गस्त करुन अपराधांना आळा घालावे तसेच वन्यजीव संरक्षित क्षेत्रात नियमित गस्त घालून वन्यजीवांचे आढळ बाबत नोंदी घ्यावे.

७) वन्यजीवांचे मृत्यु प्रकरणी किंवा वन्यप्राणी हल्यात पाळीव प्राणी मारले गेल्यास तात्काळ त्या ठिकाणी पोहचून त्याबाबत वरिष्ठांना माहिती द्यावी.

### १.२.२ वनपालांची कर्तव्ये:-

१. वनरक्षकाकडून अपेक्षित वरील सर्व कामे नियमित होत आहेत याकडे वनपालांनी लक्ष पुरविणे हे त्यांचे आद्य कर्तव्य राहील.

२. वनपालांनी आपल्या उपक्षेत्रातील सर्व पाणस्थळे व मुख्यत्वे करुन पाणीटंचाईच्या काळामध्ये पाणी उपलब्ध असलेल्या स्थळांची माहिती ठेवावी व ही माहिती आपल्या उपक्षेत्राच्या नकाशावर दर्शवावी.

३. पाणी उपलब्ध असलेल्या पाणस्थळांच्या टंचाईच्या काळात अधिक तिव्रतेने नियमित तपासणी करावी व त्यामध्ये विष किंवा युरिया टाकले जाणार नाही या दृष्टीकोनातून सतर्क रहावे.

४. वनपालांनी आपल्या अधिनस्त वनरक्षक व त्यांचे सहाय्यक यांचे सोबत नियमित रात्रीची गस्त करावी.

५. वन्यप्राण्यांकडून पाळीव जनावरे ठार होणे अथवा मनुष्य जिवीतास हानी होणा-या घटनांची ताबडतोब दखल घेवून प्राथमिक चौकशी करावी व १२ तासाचे आंत वरिष्ठांना अहवाल सादर करावा व त्यांना सहकार्य करावे.

६. मृत झालेल्या पाळीव जनावराच्या प्रकरणात विषप्रयोगाद्वारे वन्यप्राण्यांची हत्या होणार नाही याबाबत काळजी घ्यावी.

७. आपले अधिनस्त क्षेत्रातील बंदुक किंवा इतर तत्सम शस्त्रधारींची माहिती ठेवावी.

८. वन्यप्राण्यांमुळे पाळीव जनावरांचे मृत्यु प्रकरणी तसेच पिक नुकसानी प्रकरणी संबंधित यंत्रणेसोबत घटनेचा पंचनामा करुन शासन नियमानुसार सानुग्रह अनुदानाकरीता कागदपत्रे विहित मुदतीच्या आत तयार करुन प्रकरण वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे सादर करावे.

### १.२.३ वनपरिक्षेत्र अधिकारी यांची कर्तव्ये:-

१) वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त वनपाल/वनरक्षकांच्या कामाचा नियमित आढावा घ्यावा व वन्यजीव संरक्षण आराखडयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

२) उपरोक्त प्राप्त माहितीच्या आधारे त्यांनी संवेदनशिल क्षेत्राची माहिती वनपरिक्षेत्राच्या नकाशावर दर्शवावी. यामध्ये विद्युत वाहिन्यांचे अस्तित्व, पाणस्थळे, वन्यप्राणी आढळ क्षेत्र, शस्त्रधारक व्यक्तींची गावे इत्यादी माहिती दर्शविण्यात यावी.

३) संवेदनशिल क्षेत्रात वनपाल/वनरक्षकांकडून नियमित गस्त होत असल्याची खात्री करावी व त्यांचेकडून खैरियत अहवाल प्राप्त करावा. या अहवालात वन्यप्राणी मुख्यत: वाघ व बिबटया प्राण्यांचा कुठल्या क्षेत्रामध्ये वावर आहे, या माहिती मध्ये अंतर्भाव असतो.

४) वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी नियमित आपल्या परिक्षेत्रातील बिट मुख्यालयास भेट देवून व काही प्रसंगी रात्रीचा मुक्काम करुन वनमजूर व स्थानिक लोकांशी संपर्क ठेवावा व गुप्त माहिती देणा-यांचे जाळे तयार करावे.

५) वन्यप्राण्यांच्या हल्यात मृत पावलेल्या/जखमी झालेल्या पाळीव प्राण्यांच्या प्रकरणामध्ये देण्यात येणारी नुकसान भरपाई संबंधितास मिळण्यासाठी प्रकरणांचा निपटारा तात्काळ करावा.

६) ग्रामीण भागामध्ये वन्यप्राणी व पक्षी किंवा त्याच्या मासांची विक्री विशेषत: आठवडी बाजारात होवू नये याबाबत वनपरिक्षेत्र अधिका-यांनी खातरजमा करावी व तशा प्रकारचे नियमित अहवाल त्यांनी आपल्या क्षेत्रासाठी मागवावे.

७) तेंदू हंगामामध्ये तेंदूपाने गोळा करण्याकरिता मजूर संरक्षित क्षेत्रात जातात असे निदर्शनास आलेले आहे. त्या दृष्टिकोनातून आदेशीत करण्यात येते की, राष्ट्रीय उद्यान/अभयारण्यापासून ३ कि.मी. च्या आत तेंदूपाने संकलन केंद्र स्थापित करणा-या परवानाधारकावर कायदेशीर कारवाई करावी.

८) लगतचे वन्यजीव, वनविकास महामंडळाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून वन्यजीव संरक्षणाकरीता प्रभावीपणे गस्ती कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.

९) वन्यजीव गुन्हे प्रकरणात तपास कार्य पूर्ण करुन प्रकरण कोर्टात दाखल करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी यांना असल्यामुळे गुन्हे प्रकरण विहित मुदतीत न्यायालयात दाखल करावे व प्रकरणातील साक्षीदार तारखेला उपस्थित राहतील याकडे सुध्दा लक्ष द्यावे. साक्षीदार विहित तारखेला उपस्थित राहत नसतील तर सदर बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणुन आवश्यक कार्यवाही करावी. तसेच न्यायालयाकडून गुन्हेगारांना शिक्षा होण्याकरिता आवश्यक सर्व प्रयत्न करावे.

### १.२.४ सहाय्यक वनसंरक्षकांची कर्तव्ये:-

१) सहायक वनसंरक्षक यांनी वन्यप्राणी संरक्षणासंदर्भात आपल्या अधिनस्त वनरक्षक/वनपाल/वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून नियमित आढावा घ्यावा. सर्व अधिनस्त कर्मचा-यांना विहीत केलेली कामे ते काटेकोरपणे करीत आहेत याबाबत त्यांनी वेळीअवेळी, अचानकपणे दौरा करुन खात्री करावी.

२) आपल्या अधिनस्त संवदेनशील क्षेत्रात स्थानिक कर्मचा-यांसोबत नियमित गस्त करावी व संशयित गुन्हेगांराच्या हालचालीबाबतचा आढावा कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थ/पदाधिकारी यांचेकडून घ्यावा.

३) सहाय्यक वनसंरक्षक यांनी आग प्रतिबंधक उपाययोजना व्यवस्थित राबविल्या जात आहे याची खात्री करावी.

४) वन्यजीव गुन्हे प्रकरणांचा आढावा घेवून प्रकरण न्यायप्रविष्ठ करणेसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी आवश्यक मार्गदर्शन करावे. आवश्यक असल्यास तपासादरम्यान गुन्हे प्रकरणातील साक्षीदारांची बयाणे नोंदवावे. चौकशी कार्यात विशेष लक्ष घालून त्रुटी विरहीत दोषारोपपत्र न्यायप्रविष्ठ केले जाईल याकडे लक्ष द्यावे. सर्व न्यायालयीन प्रकरणांचा नियमित आढावा मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांना सादर करावा.

५) वाघ/बिबट प्राण्यांचे मृत्यु, त्यांचे शवाची विल्हेवाट लावणे तसेच मानवी वस्तीत भरकटलेल्या वाघामुळे निर्माण झालेल्या तातडीच्या परिस्थितीत करावयाची उपाययोजना, इत्यादी प्रकरणी वरिष्ठ अधिका-यांचे मार्गदर्शनाखाली याबाबत राष्ट्रीय व्याघ संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जारी केलेले प्रमाणभूत कार्यपध्दतीची अमंलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता बाळगावी.

### १.२.५ विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांची कर्तव्ये:-

१) वृत्त स्तरावर विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांनी सहायक वनसंरक्षक (संरक्षण) यांचे सभेत दर महिन्याला विभाग निहाय वन्यप्राणी गुन्हे प्रकरणाबाबत आढावा घ्यावा.

२) वन्यजीव गुन्हे संबंधी संवेदनशील क्षेत्रात वृत्तस्तरावरुन गस्तीचा कार्यक्रम आखून त्यानुसार गस्ती कायक्रमाची अंमलबजावणी करावी.

३) वृत्तस्तरावर वन्यजीव गुन्हे व गुप्तवार्ता माहितीसाठी जाळे उभारुण गुन्हेगारांबाबत माहिती संकलित करावी व त्यानुसार सर्व प्रकारचे प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवावे.

४) वन्यजीव गुन्हे प्रकरणांचे अनुषंगाने वृत्तस्तरावर प्रादेशिक, वन्यजीव तसेच वन विकास महामंडळ विभाग यांचेमध्ये आंतरविभागीय समन्वय साधण्यासाठी विभाग प्रमुख सोबत दर महिन्याला सभा घ्यावी.

५) वृत्त स्तरावर वन्यजीव विषयक गुन्हे सक्षमपणे हाताळले जातील याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

### १.२.६ उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांची कर्तव्ये :-

१) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी विभाग स्तरावरील सहायक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे मासिक सभेत वन्यजीव गुन्हे प्रकरणांचा नियमित आढावा घ्यावा. वन्यजीव गुन्हेसंबंधी न्यायालयीन प्रकरणे सक्षमपणे हाताळले जातील याबाबत दक्षता बाळगावी.

२) विभाग स्तरावर वन्यजीव गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने संवेदनशिल क्षेत्राकरीता संयुक्त गस्त कार्यक्रम तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, याबाबत दक्षता घ्यावी.

३) विभाग स्तरावर वन विभाग, वन्यजीव विभाग व वन विकास महामंडळ यांच्यात वन्यजीव गुन्हे प्रकरणी समन्वय ठेवण्यासाठी समिती गठीत करुन वन्यजीव संरक्षणाचे अनुषंगाने आवश्यक सर्व उपाययोजना कराव्या.

४) वन्यजीव गुन्हे अपराधाबाबत तपशिल जिल्हा व्याघ्र कक्षाचे सभेत वेळोवेळी निदर्शनास आणुन द्यावे व वन्यजीव गुन्हे नियंत्रणाकरीता पोलीस विभागाच्या मदतीने संयुक्त गस्त कार्यक्रम तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, या बाबत दक्षता बाळगावी.

५) विभागस्तरावर गुप्तवार्ता माहिती प्राप्तीसाठी जाळे उभारुन, वन्यजीव गुन्हेगाराबाबत माहिती संकलित करुन आवश्यक वन्यजीव गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या.

६) विभागस्तरावर सहायक वनसंरक्षक (संरक्षण) यांचे नियंत्रणाखाली वन्यजीव गुन्हे विषयक शोध व संनियंत्रण कक्ष स्थापित करुन दर महिन्याला त्याचा आढावा घ्यावा.

७) वाघ/बिबट प्राण्यांचे मृत्यु, त्यांचे शवाची विल्हेवाट लावणे तसेच मानवी वस्तीत भरकटलेल्या वाघामुळे निर्माण झालेल्या तातडीच्या परिस्थितीत करावयाची उपाययोजना, इत्यादी प्रकरणी याबाबत राष्ट्रीय व्याघ

संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जारी केलेले प्रमाणभूत कार्यपध्दतीची अमंलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता बाळगावी.

### १.२.७ मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांची कर्तव्ये:-

१) वनवृत्त स्तरावर उपवनसंरक्षक (सर्व) यांचे सभेत विभागनिहाय वन्यजीव गुन्हे प्रकरणांचा आढावा घ्यावा. वन्यजीव गुन्हेसंबंधी न्यायालयीन प्रकरणे सक्षमपणे हाताळले जातील याबाबत दक्षता बाळगावी.
२) वनवृत्त स्तरावर विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांचे नियंत्रणाखाली वन्यजीव गुन्हे विषयक शोध व संनियंत्रण कक्ष स्थापित करुन दर महिन्याला वन्यजीव गुन्हयाबाबत आढावा घ्यावा.
३) वृत्तस्तरावर वन्यजीव गुन्हे रोखण्यासाठी तसेच गुन्हयांचा, आरोपींचा शोध व तत्सम कार्यवाहीसाठी महसूल विभाग स्तरावरील क्षेत्रिय पोलीस महानिरीक्षक यांचे अध्यक्षतेखालील समितीचा आवश्यकतेनुसार उपयोग करुन घ्यावा.

## २. वन्यप्राण्यांच्या अधिवासांचे संवर्धन करणे:-

### २.१ वन्यजीव संवर्धन व्यवस्थापन आराखडा तयार करणे.

संरक्षित क्षेत्रालगतचे वन क्षेत्रात तसेच प्रादेशिक वन विभागाचे ज्या क्षेत्रात वन्यप्राण्यांचे आढळ आहे अशा क्षेत्रात वन्यप्राण्यांचे संरक्षण व संवर्धन चांगल्या रितीने होणेकरीता सदर क्षेत्रांचा समावेश करुन संरक्षित क्षेत्राकरीता व्यवस्थापन आराखडयाच्या धर्तीवर वन विभाग स्तरावर ५ वर्षाकरीता वन्यजीव संवर्धन व्यवस्थापन आराखडा तयार करावे. सदर आराखडयात वन्यजीव अधिवासाच्या विकासाचे अनुषंगाने करावयाचे वर्षनिहाय कामांचा समावेश करावा.

### २.२ वन्यप्राण्यांचे आढळ असलेल्या क्षेत्रात अधिवास विकास कामे करणे:-

प्रादेशिक वनक्षेत्रामध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेल्या वन्यजीवांची संख्या लक्षात घेवून उपवनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी वन्यप्राण्यांच्या विशेषत: वाघ, बिबट, अस्वल, रानकुत्रे व इतर अनुसूची १ तसेच इतर धोकाग्रस्त प्रजातींचे आश्रयस्थळ/प्रजनन क्षेत्र इत्यादीचा शोध घेवून अशा क्षेत्राला वन्यजीवांचे दृष्टीने संवेदनशील घोषित करावे व या क्षेत्रात विशेष उपाययोजना करुन वार्षिक आराखडा तयार करावा आणि अर्थसंकल्पात त्याचा समावेश करुन योग्य अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी. या उपाययोजनेतील विशेषत: खालील ३ बाबींचा समावेश असावा.

१) संवेदनशिल क्षेत्रात आढळणा-या वन्यप्राण्यांची सध्याची संख्या व स्थिती काय आहे व ते स्थानिक किंवा राज्यस्तरावर नष्टप्राय होण्याच्या स्थितीत आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल विभागीय स्तरावर तयार करावा.
२) या क्षेत्रात वन्यप्राण्यांचे आश्रयस्थळ/प्रजनन क्षेत्र/वावर क्षेत्र इ. ची माहिती गोळा करुन परिक्षेत्रावर नकाशात दाखवुन त्यांच्या अस्तित्वासंबंधी संभाव्य धोका ओळखुन त्यासंबंधी उपाययोजना करावी.
३) पाणी व चारा उपलब्धतेबाबत माहिती गोळा करुन पाणी, चारा व आश्रयस्थळ संबंधी अपायकारक बाबींवर मात करण्यासाठी उपाययोजना करावी.

यासंबंधी कृती आराखडा विभागीय स्तरावर तयार करुन त्याची योग्य अंमलबजावणी बाबतचा आढावा मुख्य वनसंरक्षक स्तरावरुन घेण्यात यावा असे केल्यास, संरक्षित क्षेत्राबाहेरही वन्यप्राण्यांच्या संख्येत हळुहळु

निरंतर होत असलेली घट थांबेल व त्यांचे संवर्धन, प्रजनन व संरक्षण होवून त्या भागात संरक्षित क्षेत्राप्रमाणे वन्यप्राण्यांची व पर्यायाने संख्या स्थिर होईल.

**३. वन्यजीव संरक्षण व गुप्तवार्ता प्राप्तीसाठी माहिती जाळे उभारणे :-**

वन्यजीव विषयक गुन्हयांना प्रतिबंध घालणे आणि गुन्हाशोधन करुन गुन्हेगांरावर वचक ठेवण्यासाठी वनाधिका-यांनी आपआपल्यास्तरावर गुप्त माहिती जाळे निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक लोक, वनमजूर व वनरक्षक यांना परिसरातील बारीकसारीक घडामोडींची बरीच माहिती असते. वरिष्ठ अधिका-यांनी स्थानिक कर्मचारी व लोकांशी मिसळून त्यांचेकडून महत्वाची माहिती प्राप्त करावी. अशा प्रकारे मिळालेल्या पूर्वसूचनेनुसार संभाव्य गुन्हयांवर नियंत्रण ठेवता येईल. तसेच गुप्त माहिती मिळवून वन्यजीव विषयक अवैध शिकार व व्यापार प्रतिबंधात्मक चांगले कार्य केल्याबददल वन अधिकारी व कर्मचा-यांना प्रोत्साहन देण्यात यावे व उत्कृष्ठ कामांची नोंद त्यांच्या सेवापुस्तकेत घेण्यात यावी.

**४. वन्यजीव संरक्षणाचे कामे प्रभावीपणे करण्यासाठी वन विभाग, वन्यजीव विभाग व महाराष्ट्र वन विकास महामंडळातील विभागांमध्ये समन्वय ठेवणे.**

या करीता विभाग स्तरावर तसेच वनपरिक्षेत्र स्तरावर समिती गठण करण्यात यावी व सदर समिती उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करुन त्यामध्ये वन्यजीव संरक्षणाचे अनुषंगाने करण्यात आलेल्या कामांचा आढावा तसेच वन्यजीव प्रतिबंधात्मक उपाययोजना यांचे अनुषंगाने सविस्तर चर्चा करुन पुढील महिन्यांकरीता योजनाबध्द संयुक्त गस्ती कार्यक्रम तयार करावे व वनपरिक्षेत्र स्तरावर त्यांची अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी. वनपरिक्षेत्र स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक)/वन्यजीव /वनविकास महामंडळ यांनी गस्ती कार्यक्रमाचे अंमलबजावणी करीता चर्चा करुन समन्वयाने गस्ती कार्यक्रम आपआपल्या क्षेत्रामध्ये राबवून वन्यजीव संरक्षकांचे काम यशस्वीरित्या पार पाडावे.

**५. जिल्हा व्याघ्र कक्षातर्फे संवेदनशिल क्षेत्रात संयुक्त गस्त कार्यक्रम राबविणे.**

जिल्हा व्याघ्र कक्षाचे सभेत उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी वन्यजीव अपराध बाबत तपशिल जिल्हा पोलीस अधिक्षक व इतर व्याघ्र कक्षाचे सदस्य यांचे निदर्शनास आणून द्यावी व वन्यजीव अपराध नियंत्रण व प्रतिबंधात्मक उपायोयोजनेच्या अनुषंगाने पोलीस विभागाच्या मदतीने संवेदनशील क्षेत्रात संयुक्त गस्त कार्यक्रम व रात्र कालीन संयुक्त गस्तीचे कार्यक्रम राबविण्याकरीता नियोजन करावे व त्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर केलेल्या संयुक्त गस्त कार्यक्रमाचा आढावा घेण्यात यावा.

**६. वन्यजीव संरक्षणाकरीता जनजागृती करणे:-**

वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर ग्रामपरिसरात सुध्दा जातात व त्यांचा संबंध ग्रामस्थांसोबत येतो. त्याचप्रमाणे वनक्षेत्राजवळील ग्रामस्थांमध्ये वन्यप्राण्यांबाबत भितीमिश्रीत कुतूहल असते. त्यामुळे या ग्रामस्थांना माहितीपत्रके, चित्रफिती व प्रत्यक्ष सभांचे आयोजन करुन वन्यप्राण्यांबाबत माहीती देणे आवश्यक आहे. स्थानिकांच्या मनात वन्यप्राण्यांबाबत आस्था निर्माण करुन ते त्यांच्या प्रगतितील अडचण नसुन वन्यप्राण्यांच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाचा समतोल राखले जावून ग्रामस्थांना फायदाच होईल, या बाबत त्यांना अवगत करण्यात यावे. अशा प्रकारच्या सभामध्ये शालेय विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानण्यात यावे. साधारणत: वन्यजीव क्षेत्रात ग्रामस्थ तसेच स्थानिक अधिकारी/कर्मचारी यांचे साठी नियमित अभ्यास दौरे/शिबीर/प्रबोधन कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मात्र प्रादेशिक वनक्षेत्रात वन्यजीव संबंधी असे कार्यक्रम कमी प्रमाणात घेतले जातात म्हणून उपवनसंरक्षक (प्रादेशिक)/मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी जातीने लक्ष घालून अशा कार्यक्रमाचे आयोजनात वाढ करुन वर्षभरात कमीत कमी २ प्रबोधन कार्यशाळा

ग्रामस्थ, वनसंरक्षण समिती / वन व्यवस्थापन समिती सदस्य तसेच वनरक्षक आणि वनपालांसाठी प्रत्येक परिक्षेत्रात आयोजीत कराव्या. यासाठी वन्यजीव शाखेचे सहकार्य घेण्यात यावे व त्यांनी वार्षिक आराखडयात व अर्थसंकल्पात त्याबाबत तरतूद करावी.

**७. वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा घेणे:-**

वनक्षेत्रामध्ये अथवा बाहेर सुध्दा वन्यप्राण्यांचा संचार असतो. स्थानिक कर्मचा-यांनी आपल्या क्षेत्रातील वन्यप्राण्यांचा मुख्यत्वे करुन वाघ, बिबट या प्राण्यांचा मागोवा घ्यावा. विशेषत: पावसाळयात आणि उन्हाळयात वन्यजीव वनक्षेत्राबाहेर भटकतात व याचवेळी त्यांची शिकारही होते असे आढळून आले आहे. या कालावधीत वनकर्मचा-यांनी वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा ठेवावा व या क्षेत्रात गुन्हेगारांकडून दुष्कृत्य होणार नाही, याची दक्षता बाळगावी, तसेच अशा प्रकारच्या माहितीचा दुरुपयोग गुन्हेगारांकडून होणार नाही, याची दक्षता बाळगण्याची सुध्दा आवश्यकता आहे.

**८. स्थानिक वनसंरक्षण/संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची मदत घेणे:-**

वनविभाग व वन्यजीव विभागामार्फत अनेक वनसंरक्षण/संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापित करण्यात आल्या असून, त्यांचे समन्वयाने वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत मोठी कामगिरी बजावता येऊ शकेल. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यांच्या हददीच्या बाहेर ही वनक्षेत्रात मोठया प्रमाणावर वन्यप्राणी आढळतात व बरेच वेळी ते अभयारण्य क्षेत्रातुन बाहेरही भटकतात. अशा क्षेत्रातील वनकर्मचा-यांनी स्थानिक समित्यांच्या समन्वयातून माहिती गोळा करुन वन्यप्राण्यांना आवश्यक संरक्षण पुरवावे. याबाबत वन संरक्षण/संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कार्यसुचीमध्ये जरुर तो उल्लेख करण्यात यावा.

**९. वन्यप्राणी संरक्षण उपसमिती:-**

अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यांच्या सभोवतालच्या वनक्षेत्रामध्ये अनेक प्रकारचे वन्यप्राणी आढळून येतात. त्यांचे संरक्षण करण्यासाठी लगतच्या ज्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापनामार्फत स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये **वन्यप्राणी संरक्षण उपसमितीची** निर्मिती करण्यात यावी. व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे बफर झोन क्षेत्रात व संरक्षित क्षेत्राच्या सिमे वा लगत असलेल्या गावांमध्ये ग्राम परिस्थितीकी विकास समिती गठीत करुन ग्रामस्थांना वन्यजीव संरक्षण कामात सहभागी करुन घ्यावे.

**१०. वन्यप्राण्यांचा अवैध व्यापार:-**

वन्यजीवांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांच्या आढाव्याचे दरम्यान असे आढळून आले की, वन्यप्राण्यांची गुन्हाविषयक बरीच प्रकरणे घडतात व न्यायप्रविष्ठ सुध्दा करण्यात येतात. परंतु न्यायालयात त्यांचा सतत पाठपुरावा करण्यात येत नाही. त्यामुळे काही कालावधीनंतर आरोपी निर्दोष मुक्त होतात. *विभाग स्तरावर वन्यजीव विषयक प्रकरणे निकाली काढणे तसेच न्यायालयात दाखल केलेल्या वन्यजीव विषयक गुन्हे प्रकरणांचा सतत पाठपुरावा करण्याची विशेष जबाबदारी उपवनसंरक्षक व संबंधित सहायक वनसंरक्षक यांची राहील आणि वृत्त स्तरावर वन्यजीव विषयक प्रकरणे सक्षमपणे हाताळण्याची जबाबदारी विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांची राहील.* या दृष्टीकोनातून सतत पाठपुरावा करण्यात यावा. तसेच प्रत्येक विभागाने आरोपींची व संशयीत इसमांची यादी तयार करुन ठेवावी. सराईत गुन्हेगारांची यादी छायाचित्रासह प्रत्येक परिक्षेत्र कार्यालयामध्ये ठेवण्यात यावी.

**११. मानव-वन्यप्राणी संघर्ष:-**

वन्यप्राण्यांचे संरक्षण करुन पर्यावरणाचा समतोल सांभाळणे अत्यंत आवश्यक आहे. वननितीप्रमाणे ३३ टक्के भाग वनाच्छदित असावा व त्यातील जैविक विविधता सर्वकषपणे चिरकालीन स्वरुपात राहणेसाठी संरक्षित क्षेत्राचे जाळे असावे. दिवसेंदिवस कमी होत असलेले वनाच्छादितक्षेत्र व लोकांच्या वाढत्या गरजा यांचा ताळमेळ जुळत नाही. त्यातूनच वन्यप्राणी व स्थानिक लोकांमध्ये परस्परात चढाओढ होत असल्याचे आढळते. वन्यप्राण्यांना संरक्षित क्षेत्रात संरक्षण मिळत असल्याने त्यांच्या संख्येत वाढ होत आहे. अनावधाने व जाणीवपूर्वक वन्यप्राणी खाजगी क्षेत्रात प्रवेश करतात. वन्यजीवांपासून मिळणारे फायदे व तोटयांचा एकत्रितपणे विचार न होता गैरसमजुतीपोटी काही वेळा केवळ नुकसान झाल्याचीच ओरड होते. वन्यप्राण्यामुळे मनुष्यहानी, पशुधनहानी किंवा पिक नुकसानीचे प्रकरणात वाढ झाल्यास व पिडीत लोकांना वेळेत नुकसान भरपाई देण्यात उशीर झाल्यास लोकांकडून वन्यप्राण्यांच्या जीवाला धोका उदभवू शकतो. या करीता नुकसानभरपाईबाबत सानुग्रह अनुदान पीडीत व्यक्तीला लवकरात लवकर मिळण्यासाठी खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

१) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या मनुष्यहानीसाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दि.३० मार्च, २०१३ व दि.१६ जानेवारी, २०१५ अन्वये अर्थसहाय्य देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
२) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशुधनहानी झाल्यास, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दि.०२.०७.२०१० अन्वये अर्थ सहाय्य मिळण्याकरीता कार्यवाही करण्यात यावी.
३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामूळे शेतपीक /फळबाग नुकसानीचे प्रकरणात, शासन निर्णय क्र. डब्लुएलपी २०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दि. ०५ सप्टेबर २०१३ अन्वये देय अर्थसहाय्यकरीता कार्यवाही करण्यात यावी.

मानव वन्यजीव संघर्षाची परिस्थिती निर्माण झाल्यास राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी या संबंधात जारी केलेले प्रमाणभूत कार्यपध्दती नुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबत दक्षता बाळगावी.

## १२. मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती व कर्तव्ये:-

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ४ (१) (ख ख) नुसार प्रत्येक जिल्हयातील मानद वन्यजीव रक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. शासनाचे दिनांक २७ सप्टेंबर २००१ च्या राजपत्रानुसार कलम ५५ चे तरतुदीचे वापर करण्याचे अधिकार मानद वन्यजीव रक्षकांना देण्यात आले आहेत. मानद वन्यजीव रक्षकांनी खालील कर्तव्ये करणे अपेक्षित आहे.

(१) लोकांमध्ये निसर्ग व वन्यजीव संवर्धनाबाबत आस्था व जागृती निर्माण करणे.
(२) राज्य वन्यजीव सल्लागार मंडळ किंवा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी सुचविलेल्या वन्यजीव संरक्षण विषयक प्रकरणांमध्ये सहभाग घेणे.

निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे जरुरीचे आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम २१ अंतर्गत मानद वन्यजीव रक्षक यांना लोकसेवक मानले असून वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या कलम ६० प्रमाणे चांगल्या हेतूने केलेल्या कृत्यांबददल त्यांना संरक्षण प्रदान केले आहे.

## १३. वनवृत्तस्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना:-

महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक ७ नोव्हेंबर, २००० अन्वये राज्यात व्याघ्र कक्षाची स्थापना करण्यात आली असून, राज्यस्तरावर अतिरिक्त पोलीस महानिदेशक (मुख्यालय), यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्यांचे मार्फत वन्यप्राण्यांच्या अवयवांची अवैध तस्करी व व्यापार इत्यादी सारखी प्रकरणे रोखण्यासाठी पोलीस, वन व इतर विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात येतो.

अशाच प्रकारे महसूल विभागस्तरावर सुध्दा क्षेत्रिय पोलीस महानिरीक्षक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. अवैध गुन्हे रोखण्यासाठी तसेच गुन्हयांचा, आरोपींचा शोध व तत्सम पुढील कार्यवाहीसाठी सुध्दा या समितीचा पुरेपूर उपयोग करण्यात यावा.

याच धर्तीवर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी आपआपल्या वनवृत्तस्तरावर विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांचे अध्यक्षतेखाली व विभागीय स्तरावर सहायक वनसंरक्षक (संरक्षण) फिरतेपथक यांचे अधिपत्याखाली वन्यजीव गुन्हे विषयक शोध व सनियंत्रण कक्ष स्थापित करण्यात यावे. या कक्षांचा आढावा दर महिन्याला अनुक्रमे संबंधित मुख्य वनसंरक्षक व उपवनसंरक्षक यांनी घ्यावा. तसेच हा कक्ष वर उल्लेख केलेल्या महसूल विभागस्तरीय समितीच्या संपर्कात राहील.

**१४. <u>राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दती अवलंबिणे:-</u>**

मानवी वस्तीत भरकटलेल्या वाघामुळे निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती, वाघ/बिबट चे मृत शरीर अथवा अवयवांची विल्हेवाट करणे, वाघाचा मृत्यू झाल्यास, जंगलातील वाघाच्या पोरक्या बछडयासाठी आणि म्हाता-या किंवा जखमी वाघांची प्रकरणे हाताळणे बाबत आणि मानव-बिबट संघर्ष व्यवस्थापन बाबत मार्गदर्शक तत्वे इत्यादी प्रकरणात राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी यासंबंधाने जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दती अवलंबिली जाईल याबाबत वरिष्ठ अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

**१५. <u>वन्यप्राण्यांची शिकार, नक्षलवाद्यांकडून, संघटित तस्करांकडून होणारे हल्ले इत्यादी गंभीर घटनांबाबत माहिती शासनास तत्काळ सादर करणे:-</u>**

महाराष्ट्र राज्यात वन्यजीव प्राण्यांची शिकार, नक्षलवाद्यांकडून होणारे हल्ले, संघटित तस्करांकडून होणारे हल्ले तसेच मानव वन्यप्राणी संघर्षामुळे उत्पन्न होणारी स्थिती आणि अन्य इतर स्वरुपाच्या गंभीर घटना घडतात. या बाबत शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१५/स.क्र.४/फ-५, दिनांक ०६.०१.२०१५ अन्वये अशा प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या घटनांची माहिती शासनास कळविणे आवश्यक असल्यामुळे, संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव), वनसंरक्षक, उपवनसंरक्षक यांनी अशा गंभिर स्वरुपाच्या घटना बाबतची माहिती सचिव (वने) तसेच मंत्रालयातील मुख्य वनसंरक्षक/सह सचिव (वने)/विशेष कार्य अधिकारी यांना एसएमएस व ई-मेल व्दारे विनाविलंब कळविण्यात यावे.

**१६. वन्यप्राणी व त्यांचे अधिवासाचे संनियंत्रण/सर्वेक्षण:-**

**१६.१ <u>अखिल भारतीय मांसभक्षी/तृणभक्षी प्राणी व त्यांचे अधिवासाचे संनियंत्रण, टप्पा-१ (Phase-I):-</u>**

वन विभाग, वन्यजीव विभाग व वन विकास महामंडळाचे नियंत्रणातील सर्व नियत क्षेत्रात दरवर्षी अखिल भारतीय मांसभक्षी/तृणभक्षी प्राणी व त्यांचे अधिवासाचे संनियंत्रण कार्यक्रम भारतीय वन्यजीव संस्था, देहराडून यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार राबविण्यात यावे व त्याबाबतची माहिती विहित प्रपत्र/सॉफ्टवेअर मध्ये वृत्त स्तरावर संकलीत करुन वृत्तनिहाय अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास सादर करावे.

**१६.२ <u>टप्पा-४ (Phase-IV) संनियंत्रण:-</u>**

वाघांचे अस्तित्व असलेल्या सर्व प्रादेशिक विभागांचे क्षेत्रात तसेच सर्व संरक्षित क्षेत्रात राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार टप्पा-४ (Phase-IV) संनियंत्रण कार्यक्रम दरवर्षी राबविण्यात यावे व त्याबाबतची माहिती विहित प्रपत्र/सॉफ्टवेअर मध्ये भरुन वृत्त स्तरावर ***संकलीन करुन***

वृत्तनिहाय अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास सादर करावे.

### १६.३ पाणवठयावरील प्रगणना:-

दरवर्षी माहे एप्रिल/मे महिन्यात येणा-या पोर्णीमेच्या दिवशी पाणवठयावरील वन्यप्राणी संनियंत्रण कार्यक्रम राबविण्यात यावे व त्याबाबतची माहिती विहित प्रपत्रात भरुन वृत्त स्तरावर संकलीत करुन वृत्तनिहाय अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास सादर करावे.

## १७. इतर महत्वाच्या सूचना:-

**१७.१** शिकारीमध्ये किंवा अपघातामध्ये वन्यप्राणी मृत झाल्यास पंचनामा करुन अवयवांसह विल्हेवाट लावण्यात यावी व न्यायप्रविष्ठ प्रकरणाव्यतिरिक्त इतर प्रकरणांमध्ये मृत शवाचा कुठलाही अवयव जतन करण्यात येवू नये. वाघ व बिबट या प्राण्यांचे संपूर्ण मृत शव अथवा अवयवांची विल्हेवाट राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी यासंबंधाने जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीनुसार जाळून नष्ट करण्यात यावे.

**१७.२** वन्यप्राण्यांच्या मृत्यूबाबत प्राथमिक माहिती संबंधीत वनक्षेत्रपाल यांनी घटना कळल्यानंतर संबंधीत उपवनसंरक्षकांना १२ तासांचे आत द्यावी. संबंधित उपवनसंरक्षक यांनी घटना घडल्याच्या २४ तासाचे आंत मुख्य वनसंरक्षक, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) यांना माहिती द्यावी व घटना स्थळालाही २४ तासाच्या आंत भेट द्यावी. या संदर्भात तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२३ (ब)/०७/००-०१, दि.३.४.२००१ अन्वये सूचना तत्कालीन वनसंरक्षक (सर्व) व उपवनसंरक्षक (सर्व) यांना देण्यात आलेल्या आहेत. वन्यप्राण्यांच्या गुन्हयांच्या संदर्भात चौकशी प्राधान्याने व लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे.

**१७.३** वाघ, बिबट, काळविट इत्यादी अनुसूची-१ मधिल वन्यप्राण्यांच्या मृत्यूबाबत प्रकरणांमध्ये उपवनसंरक्षकांनी तात्काळ घटनेच्या स्थळास भेट देवून त्याबाबत वरिष्ठांना माहिती द्यावी.

**१७.४** प्राथमिक अहवालानंतर एका आठवडयाच्या आंत द्यावयाच्या सविस्तर अहवालामध्ये सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहितीचा अंतर्भाव करावा (परिशिष्ट-४). सदर अहवाल उपवनसंरक्षक यांनी संबंधीत मुख्य वनसंरक्षक व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना शिघ्र टपालाने पाठवावे. उपरोक्त नमूद वृत्तस्तरावरील व विभागीय स्तरावरील शोध व नियंत्रण कक्ष स्थापन केल्यानंतर गुन्हयांना प्रतिबंध व नियंत्रण परिणामकारक होतील याकडे सर्व अधिका-यांनी जातीने लक्ष द्यावे. संरक्षित क्षेत्राबाहेरही अशा प्रकरणावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता असून, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी "शोध व नियंत्रण" कक्षाचे कामाबाबत नियमित आढावा घ्यावा. वन्यजीव गुन्हे प्रकरणात आवश्यकता वाटल्यास तांत्रिक बाबीवर उप वनसंरक्षक यांनी संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा सल्ला वा मदत घ्यावी.

**१७.५** वन्यप्राण्यांच्या अधिवासाच्या संवर्धन व विकासासाठी पाणस्थळांची निर्मिती, फळझाडांची लागवड, कुरण विकास इत्यादी कामे प्राधान्याने घेण्यात यावी. अधिवास क्षेत्राच्या विकासामुळे तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढीस लागुन त्यावर अवलंबून असणा-या मांसभक्षक प्राण्यांच्या संख्येतसुध्दा पर्यायाने वाढ होईल. पाणवठे, वनतळी, वनबंधारे व एनिकटस मधुन उपलब्ध अनुदानातून नियमित गाळ काढून शक्यतो उन्हाळयायत व टंचाईचे कालावधीत नियमित पाणी उपलब्ध करुन द्यावे अशा पाणस्थळाचे अवैध शिकारी व पाळीव जनावरांपासून संरक्षण करणे आवश्यक आहे.

१७.६ वन्यप्राण्यांचे संवर्धन व विकासासाठी वनक्षेत्राची सलगता असणे आवश्यक आहे. जेणेकरुन वन्यप्राण्यांची पुढील प्रजाती आपसातील संकर टाळुन अनुवंशिकदृष्टया सक्षम निर्माण होतील. सद्य:स्थितीमध्ये वनक्षेत्रे ही विभागलेली आहेत व एक दुस-याचा संबंधी शेती किंवा पडीत/उजाड जमिनीद्वारे आहे. अशा क्षेत्राजवळ राहणा-या स्थनिक ग्रामस्थांचे प्रबोधन करुन वन्यप्राणी भ्रमण क्षेत्रातील अडथळे दूर करणे जरुरीचे आहे. यामध्ये प्रामुख्याने जे पाणवठे वन्यजीव वापरतात त्यांची नियमित देखरेख करणे व पाळीव जनावरे त्या पाणवठयावर येणार नाही याची खात्री करणे, पाळीव जनावरांसाठी गावालगत पाण्याची सोय उपलब्ध अनुदानातून करणे व संक्रमक रोग थांबविण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पाळीव प्राण्यांचे लसीकरण कार्यक्रम घेण्यासंबंधी बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या क्षेत्रात स्थानिक ग्रामस्थांचा हस्तक्षेप जास्त प्रमाणात राहणार नाही यासाठी संबंधित वनाधिका-यांनी, वन व पर्यावरणाचे महत्व सभा/संम्मेलनाद्वारे ग्रामस्थांना पटवून दयावे.

१७.७ वन्यप्राणी व स्थानिक ग्रामस्थ यांच्यातील सहजीवन सुखद करण्यासाठी पोलीस पाटील, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अशासकिय संस्था व मानद वन्यजीव रक्षक इत्यादीचे सहकार्य घेण्यात यावे. त्यांच्यामध्ये वन्यप्राण्यांबाबत आस्था निर्माण करुन त्यांचा संरक्षणाच्या कामात उपयोग करुन घ्यावा.

१७.८ वनालगत असणा-या काही गावातील गावकरी वनामधील नदी, नाले आणि वनतलावामधून पाणी दैनंदिन उपयोगासाठी आणतात. यामुळे वन्यजीव व गावकरी यांचे हितसंबंध बिघडतात त्यासाठी स्थानिक अधिका-यांनी ही बाब जिल्हा प्रशासनाच्या नजरेस आणुन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कळवावे व पाठपुरावा करावा.

१८. वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग व वन विकास महामंडळ मध्ये कार्यरत असलेल्या वेगवेगळया स्तरावरील वन अधिकारी/कर्मचारी हे त्यांचे क्षेत्राबाबत वरील प्रमाणे संपूर्ण माहिती गोळा करुन वरिष्ठ अधिका-यांना नियमित सादर करतील आणि वरील प्रमाणे दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे त्यांचे क्षेत्रामध्ये करतील. सर्व अधिकारी/कर्मचारी जेव्हा निरिक्षणासाठी जातात तेव्हा त्यांनी वन्यप्राण्यांचे संवर्धन आणि संरक्षणासाठी आढावा घेऊन त्यावर त्वरीत उपाययोजना करावी. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना आपले स्वयंमुल्यमापन अहवालात वन्यजीव संरक्षण व संवर्धनाबाबत काम केल्याचा उल्लेख करणे उचित ठरेल.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**परिशिष्ट-१**

## महाराष्ट्र राज्यातील संरक्षित क्षेत्राबाबत तपशिल

### राष्ट्रीय उद्याने

| अ.क्र. | अभयारण्य, राष्ट्रीय उद्यानाचे नाव | अधिसूचनेचा दिनांक | क्षेत्र (चौ. कि.मी.) |
|---|---|---|---|
| १. | गुगामल राष्ट्रीय उद्यान * | २७/११/१९८७ & ८/८/२००० | ३६१.२८० |
| २. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | ४/२/१९८३ & १६/१/१९९६ | ८६.९६५ |
| ३. | ताडोबा राष्ट्रीय उद्यान * | ३१/३/१९५५ | ११६.५५० |
| ४. | चांदोली राष्ट्रीय उद्यान | १४/५/२००४ | ३१७.६७० |
| ५. | नवेगाव राष्ट्रीय उद्यान * | २२/११/१९७५ | १२९.५५ |
| ६. | पेंच राष्ट्रीय उद्यान * | २२/११/१९७५ | २५७.२६ |

### *अभयारण्ये*

| अ.क्र. | अभयारण्याचे नाव | अधिसूचनेचा दिनांक | क्षेत्र (चौ. कि.मी.) |
|---|---|---|---|
| १ | अंबाबरवा अभयारण्य * | ९/४/१९९७ | १२७.११० |
| २ | अंधारी अभयारण्य * | २५/२/१९८६ | ५०९.२७० |
| ३ | अनेर डॅम अभयारण्य | १०/१०/१९८६ | ८२.९४० |
| ४ | भामरागड अभयारण्य | ६/५/१९९७ | १०४.३८० |
| ५ | भीमाशंकर अभयारण्य | १६/९/१९८५ | १३०.७८० |
| ६ | बोर अभयारण्य | २७/११/१९७० | ६१.१०० |
| ७ | चपराळा अभयारण्य | २५/२/१९८६ | १३४.७८० |
| ८ | देऊळगाव-रेहेकुरी अभयारण्य | २९/२/१९८० | २.१७० |
| ९ | ज्ञानगंगा अभयारण्य | ७/५/१९९७ & ९/५/१९९७ | २०५.२१० |
| १० | माळढोक अभयारण्य (पुनर्रचित) | २७/२/२०१२ | १२२९.२४ |
| ११ | गौताळा औत्रमघाट अभयारण्य | २५/२/१९८६ | २६०.६१० |
| १२ | जायकवाडी पक्षी अभयारण्य | १०/१०/१९८६ | ३४१.०५० |
| १३ | कळसूबाई-हरीश्चंद्रगड अभयारण्य | २५/२/१९८६ | ३६१.७१० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कारंजा-सोहळ काळवीट अभयारण्य | ७/१२/२००० | १८.३२१ |
| १५ | कर्नाळा फोर्ट पक्षी अभयारण्य | ६/५/१९६८ & २३/१/२००३ | १२.१५५ |
| १६ | काटेपूर्णा अभयारण्य | ८/२/१९८८ | ७३.६९ |
| १७ | कोयना अभयारण्य * | १६/९/१९८५ | ४२३.५५ |
| १८ | लोणार अभयारण्य | ८/६/२००० | ७३.६९० |
| १९ | मालवण सागरी अभयारण्य | १३/४/१९८७ | ४२३.५५० |
| २० | मयुरेश्वर सुपे अभयारण्य | १९/८/१९९७ | ३.८३१ |
| २१ | मेळघाट अभयारण्य * | ५/९/१९८५ & १५/२/१९९४ | २९.१२२ |
| २२ | नायगाव मयूर अभयारण्य | ८/१२/१९९४ | ५.१४५ |
| २३ | नांदूर मध्यमेश्वर अभयारण्य | २५/२/१९८६ | ७८८.७५० |
| २४ | नरनाळा अभयारण्य * | २/५/१९९७ | २९.९०१ |
| २५ | नागझिरा अभयारण्य * | ३/६/१९७० | १५२.८१० |
| २६ | पैनगंगा अभयारण्य | २५/२/१९८६ & २४/२/२००४ | ४२४.८९० |
| २७ | फणसाड अभयारण्य | २५/२/१९८६ | ६९.७९० |
| २८ | राधानगरी अभयारण्य | २/१२/१९५८ & १६/९/१९८५ | ३५१.१६० |
| २९ | सागरेश्वर अभयारण्य | १६/९/१९८५ | १०.८७७ |
| ३० | तानसा अभयारण्य | १२/६/१९७० & १६/९/१९८५ | ३०४.८१० |
| ३१ | टिपेश्वर अभयारण्य | २४/१/१९९७ & ३०/४/१९९७ | १४८.६३२ |
| ३२ | तुंगारेश्वर अभयारण्य | २४/१०/२००३ | ८५.७०० |
| ३३ | वान अभयारण्य * | २८/७/१९९७ & २९/७/१९९७ | २११.००६ |
| ३४ | यावल अभयारण्य | २१/३/१९६९ | १७७.५२० |
| ३५ | ऐडशी रामलींगघाट अभयारण्य | १६/५/१९९७ & १७/५/१९९७ | २२.३७४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | मानसिंगदेव अभयारण्य | २/११/२०१० | १८२.५८० |
| ३७ | नवीन नागझिरा अभयारण्य * | २९/२/२०१२ | १५१.३३५ |
| ३८ | नवेगाव अभयारण्य * | २८/२/२०१२ | १२२.७५६ |
| ३९ | नवीन बोर अभयारण्य | २८/२/२०१२ | ६०.६९ |
| ४० | नवीन माळढोक पक्षी अभयारण्य | २८/२/२०१२ | ०१.९८ |
| ४१ | उमरेड करांडला अभयारण्य | २९/०६/२०१२ | १८९.२९ |
| ४२ | ताम्हीणी अभयारण्य | ०३/०५/०२०१३ | ४९.६२ |
| ४३ | कोका अभयारण्य * | १८/०७/२०१३ | ९७.६२४ |
| ४४ | न्यु बोर विस्तारीत अभयारण्य * | ०३/०५/२०१४ | १६.३१ |
| ४५ | प्राणहिता अभयारण्य | २७/०८/२०१४ | ४२०.०६ |
| ४६ | सुधागड अभयारण्य | २८/०८/२०१४ | ७७.१२८ |
| ४७ | ईसापूर अभयारण्य | ३०/०८/२०१४ | ३७.८०३ |

*** सदर संरक्षित क्षेत्राचा समावेश व्याघ्र राखीव क्षेत्रात होतो.**

## संवर्धन राखीव क्षेत्र

| अ.क्र. | संवर्धन राखीव क्षेत्राचे नाव | अधिसूचनेचा दिनांक | क्षेत्र (चौ. कि.मी.) |
|---|---|---|---|
| १. | भोरगड संवर्धन राखीव | ०५/०३/२००८ | ३.४९३ |
| २. | ममदापूर संवर्धन राखीव | २४/०६/२०१४ | ५४.४६ |
| ३. | कोलामार्का संवर्धन राखीव | ०८/०१/२०१३ | १८०.७२ |
| ४. | मुक्ताई भवानी संवर्धन राखीव | ०३/०५/२०१४ | १२२.७४ |

**गोषवारा**

| अ.क्र. | संरक्षित क्षेत्र | संख्या | क्षेत्र (चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय उद्याने | ६ | १२६९.२७५ |
| २ | अभयारण्ये | ४७ | ८४२०.८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | संवर्धन राखीव क्षेत्र | ४ | ३६१.४१३ |
| | **एकूण** | **५७** | **१००५१.५२९** |

# ६ व्याघ्र राखीव क्षेत्रा अंतर्गत राष्ट्रीय उदयाने व अभयारण्ये

| **अनु क्र** | **व्याघ्र राखीवक्षेत्र** | **क्षेत्र (चौ.कि.मी.)** | | | **समाविष्ठ राष्ट्रीय उदयान** | **क्षेत्र (चौ.कि.मी)** | **समाविष्ठ अभायारण्य** | **क्षेत्र (चौ.कि.मी).** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **गाभा** | **बफर** | **एकूण** | | | | |
| १ | मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र | १५००.४९ | १२६८.०३ | २७६८.५२ | गुगामल राष्ट्रीय उदयान | ३६१.२८ | मेळघाट अभायारण्य | ७८८.७५ |
| | | | | | | | वान अभायारण्य | २११.०० |
| | | | | | | | नरनाळा अभायारण्य | १२.३५ |
| | | | | | | | अंबाबरवा अभायारण्य | १२७.११ |
| २ | ताडोबा-अंधारी व्याघ्र राखीवक्षेत्र | ६२५.८२ | ११०१.७७ | १७२७.५९ | ताडोबा राष्ट्रीय उदयान | ११६.५५० | अंधारी अभायारण्य | ५०९.२७ |
| ३ | पेंच व्याघ्र राखीवक्षेत्र | २५७.२६ | ४८३.९६ | ७४१.२२ | पेंच राष्ट्रीय उदयान | २५७.२६ | मानसिंगदेव अभायारण्य | १८२.५८ |
| ४ | सहयाद्री व्याघ्र राखीवक्षेत्र | ६००.१२ | ५६५.४५ | ११६५.५७ | चांदोली राष्ट्रीय उदयान | ३१७.६७ | कोयना अभायारण्य | ४२३.५५ |
| ५. | नवेगाव-नागझीरा व्याघ्र राखीवक्षेत्र | ६५३.६७ | **१२४७.४६** | **१९०१.१३** | नवेगाव राष्ट्रीय उदयान | १२९.५५ | नागझीरा अभायारण्य | १५२.५८ |
| | | | | | | | न्यु नागझीरा अभायारण्य | १५१.३३ |
| | | | | | | | नवेगाव अभायारण्य | १२२.७५ |
| | | | | | | | कोका अभायारण्य | १००.१३ |
| ६ | बोर व्याघ्र राखीवक्षेत्र | १३८.१२ | ६६१.१६ | ७९९.२८ | | -- | बोर अभायारण्य | ६१.१० |
| | | | | | | | न्यु बोर अभायारण्य | ६०.७० |
| | | | | | | | न्यु बोर विस्तारीत अभायारण्य | १६.३२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण व्याघ्र राखीव क्षेत्र** | **३७७८.१७** | **३४१९.२२** | **७१९४.४२** | **एकूण राष्ट्रीय उद्यान क्षेत्र** | **११८२.३१** | **एकूण अभयारण्य क्षेत्र** | **३२१७.२२६** |

## परिशिष्ट-२

**महसूल व वन विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २१ जुलै, २०१३.**

**<u>अधिसूचना</u>**

**वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२.**

क्रमांक डब्ल्युएलपी.०६१३/प्र.क्र.१९९/फ-१ ज्याअर्थी, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) (त्यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४, पोट-कलम (१), खंड (ख) व (ग) यांव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्यूएलपी १०७७/८६५८४/फ-१ दिनांक ५ मे, १९७७ अनुसार अपर मुख्य वन्यजीव रक्षक, उप मुख्य वन्यजीव रक्षक, वन्यजीव रक्षक व सहायक वन्यजीव रक्षक यांची नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ५४ च्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१०७७/८६५८४/फ-१, दिनांक ५ मे, १९७७ अनुसार मुख्य वन्यजीव रक्षक, अपर मुख्य वन्यजीव रक्षक व उपमुख्य वन्यजीव रक्षक यांना अधिकार प्रदान केले आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१०९७ /प्र.क्र.१२१/फ-१, दिनांक २६ सप्टेंबर, २००१ यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ५५ खंड (ख) च्या प्रयोजनार्थ मुख्य वन्यजीव रक्षक यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी, राज्याच्या प्रत्येक जिल्हयात (वाशिम व नंदूरबार वगळता) मानद वन्यजीव रक्षक यांना प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१००३/प्र.क्र.८९/फ-१, दिनांक २३ फेब्रुवारी, २००४ यानुसार उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहा - क मधील सक्षम प्राधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी विवक्षित अधिका-यांना प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१००३/प्र.क्र.८९/फ-१, दिनांक २३ फेब्रुवारी, २००४ यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ५०, पोट-कलम (८), खंड (क) ते (घ) मधील अधिकारांचा वापर करण्यासाठी सर्व अपर मुख्य वन्यजीव रक्षक, उपमुख्य वन्यजीव रक्षक व वन्यजीव रक्षकांना प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, वन विभाग तसेच महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांच्या संघटनात्मक संरचनेतील झालेला बदल आणि त्यानुषंगाने विविध पदाची झालेली श्रेणीवाढ आणि परिणाम स्वरुप उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या विवक्षित पदांच्या पदनामांमध्ये झ ाालेला बदल विचारात घेता, या अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यासाठी, नियुक्त करण्यासाठी व प्राधिकृत करण्यासाठी अधिसूचना निर्गमित करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, आता, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, कलम ४ चे पोट-कलम (१), कलम ५० चे पोट-कलम (८), कलम ५४, ५८ घ, ५८ छ आणि ६० ख यांव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत वेळोवेळी काढण्यात आलेल्या वर नमूद केलेल्या सर्व अधिसूचना व आदेशांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे,

(एक) सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे वन विभाग व महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित या संघटनेमध्ये पुढील अधिकाऱ्यांची त्यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रासाठी वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्ती करीत आहे.

**अनुसूची**

| **अनुक्रमांक** | **संघटना** | **अधिकारी** |
|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** |
| १ | वन विभाग | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुख्य वनसंरक्षक, व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उप विभागांचे उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक. |
| २ | महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित | महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक. |

**स्पष्टीकरण** - वरील अनुसूचीमधील अनुक्रमांक १ समोरील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव अशा दोन्ही शाखांमधील अधिका-यांचा समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) याचा समावेश आहे.

(दोन) सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या वन विभाग, वन विकास महामंडळ मर्यादित या संघटनेमधील अधिकाऱ्यांना व पोलीस अधिकाऱ्यांना स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उक्त अधिनियमाच्या विविध कलमांच्या प्रयोजनार्थ, नियुक्त करीत आहे, त्यांना अधिकार प्रदान करीत आहे व प्राधिकृत करीत आहे.

**अनुसूची**

| **अनुक्रमांक** | **अधिकारी** | **कलमे** |
|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** |
| १ | (एक) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उपविभागांचे उपविभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक व वन परिक्षेत्र अधिकारी.<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित यांचे महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक आणि विभागीय व्यवस्थापक. | ४९ (२) |
| २ | (एक) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उपसंचालक, स्वतंत्र उपविभागांचे उपविभागीय वन अधिकारी | ५० (८) |

| | | |
|---|---|---|
| | आणि सहायक वनसंरक्षक<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित यांचे महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक व सहायक व्यवस्थापक. | |
| ३ | (एक) मुख्य वन्यजीव रक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक व उप वनसंरक्षक.<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादितचे महाव्यवस्थापक व प्रादेशिक व्यवस्थापक. | ५४ |
| ४ | पोलीस उप निरिक्षक या दर्जापेक्षा खाली नसलेला पोलीस अधिकारी | ५५ ख |
| ५ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक. | ५८ घ |
| ६ | मुख्य वन्यजीव रक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक व वनसंरक्षक. | ५८ छ |
| ७ | मुख्य वन्यजीव रक्षक | ६० ख |

**स्पष्टीकरण (१) :-** वरील अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांमध्ये वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव या दोन्ही शाखांमधील अधिका-यांचा समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) याचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण (२) :-** या अधिसूचनेद्वारे अधिक्रमण करण्यात आलेल्या आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनांद्वारे किंवा आदेशांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीच्या परिणामी, जी कोणतीही कार्यवाही सुरु असेल, अशा कोणत्याही कार्यवाहीवर, या अधिसूचनेतील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहोचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.यु.एम.फारूकी),
शासनाचे सह सचिव

**परिशिष्ट-३**

**मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**वनभवन, रामगिरी रोड, नागपूर-४४०००१**

**दिनांक २६ जुलै २०१३**

**आ दे श**

वन्यजीव (संरक्षण), अधिनियम, १९७२

क्र.कक्ष-२३(४)/प्र.क्र.४९४/१६०३- वन्यजीव (संरक्षण), अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (२) याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत काढण्यात आलेल्या इतर सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन, मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, हे शासकीय पत्र क्रमांक डब्ल्युएलपी-०६१३/प्र.क्र.१९९/फ-१, दिनांक २२, जुलै २०१३ या अन्वये दिलेल्या राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, याव्दारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक डब्ल्युएलपी-०६१३/प्र.क्र.१९९/फ-१, दिनांक २१ जुलै, २०१३ या अन्वये नियुक्त केलेल्या वन्यजीव रक्षकांकडे, आणि राज्य शासनाकडून वेळोवेळी नियुक्त करण्यात येतील त्याप्रमाणे, स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानद वन्यजीव रक्षकांकडे, त्यांच्या संबंधित क्षेत्रीय अधिकारितेनुसार या अधिनियमा खालील त्यांचे अधिकार व कर्तव्ये, पुढील प्रमाणे सोपवीत आहेत:-

**<u>अनुसूची</u>**

| **अ.क्र.** | **वन्यजीव रक्षक किंवा मानद वन्यजीव रक्षक** | **कलमे** |
|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** |
| १ | अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक | ११(१)(ख), १७ग(१), १७घ(१), १७ड(१), २७(१)(ख), २७(२)(ग), २८, ३१ तसेच ३५(८), ३३(क), ३३(ख), ३३(ग), ३३क, ३४ तसेच ३५(८), ३४क(१)(क), ३४क (१)(ख), ३९(३), ४०(१), ४०(२), ४०(४), ४१(१), ४२, ४३(२), ४४(२), ४४(३), ४४(४), ४४(७), ४५, ४७(क)(दोन), ४७(ख), ४८क, ४९ग(१), ४९ग(२), ४९(ग)(६), ५०(१), ५०(३), ५०(३क), ५०(६), ५४ आणि ५५(ख). |

| अ.क्र. | वन्यजीव रक्षक किंवा मानद वन्यजीव रक्षक | कलमे |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २ | महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | ११(१)(ख), ३३क, ३४क(१)(क), ३४क(१)(ख), ३९(३), ५०(१), ५०(३), ५०(३क), ५०(६), ५४ व ५५(ख). |
| ३ | उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उप-विभागांचे उप- विभागीय वन अधिकारी | ११(१)(ख), १७ग(१), १७घ(१), १७ड(१), २७(१)(ख), २७(२)(ग), २८(१)(घ), २८(१)(ड.), ३१ तसेच ३५(८), ३३(क), ३३(ख), ३३(ग), ३३क, ३४(१), ३४(२) तसेच ३५(८), ३४क (१)(क), ३४क(१)(ख) (स्वतंत्र उपविभागांच्या उप-विभागीय वन अधिका-यांचे अधिकार हे, कोणतेही अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान यांमधील कोणत्याही शासकीय जमिनीवर उभारलेल्या अनधिकृत संरचना, इमारती किंवा बांधकामे काढून टाकण्याच्या मर्यादेपर्यंतच निर्बंधित असतील आणि त्यामध्ये अधिहरणाच्या अधिकाराचा समावेश नसेल, याव्यतिरिक्त संपूर्ण अधिकार) ३९(३), ४०(१), ४०(२), ४१(१), ४७(क)(दोन), ४७(ख), ४८(क), ४९ग(१), ४९ग(२), ४९ग(६), ५०(१), ५०(३), ५०(३क), ५०(६), ५४ (केवळ उप वनसंरक्षक) आणि ५५(ख). |
| ४ | विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | ११(१)(ख), ३३क, ३४क(१)(क), ३४क(१)(ख), (अधिहरणाचा अधिकार वगळून) ३९(३), ५०(१), ५०(३), ५०(३क), ५०(६) आणि ५५(ख). |
| ५ | सहायक वनसंरक्षक | ११(१)(ख), २७(२)(ग), २८(१)(घ), २८(१)(ड), ३१ तसेच ३५(८), ३३क, ३४क(१)(क), ३४क(१)(ख), (अधिहरणाचा अधिकार वगळून) ४१(१), ४७(ख), ५०(१), ५०(३), ५०(३क), ५०(६), आणि ५५(ख). |
| ६ | सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | ११(१)(ख) [केवळ निलगाय (Boselaphus tragocamelus) आणि रानडुक्कर (Sus scrofa)] ३४ क(१)(क), ३४क(१)(ख), (अधिहरणाचा अधिकार वगळून) ५०(१), ५०(३), ५०(६) आणि ५५(ख). |
| ७ | वन परिक्षेत्र अधिकारी | ११(१)(ख) [केवळ निलगाय (Boselaphus tragocamelus) आणि रानडुक्कर (Sus scrofa)] २७(२)(ग), ४१(१), ४७(ख), ५०(१), ५०(३), ५०(६) आणि ५५(ख). |
| ८ | वन परिक्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित | ११(१)(ख) [केवळ निलगाय (Boselaphus tragocamelus) आणि रानडुक्कर (Sus scrofa)] ५०(१), ५०(३), आणि ५५(ख). |
| ९ | वनपाल, वनरक्षक | २७(२)(ग), ५०(१) आणि ५०(३). |
| १० | महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यामधील वनपाल व वनरक्षक | ५०(१) आणि ५०(३). |
| ११ | मानद वन्यजीव रक्षक | ५५(ख). |

**स्पष्टीकरण (१)** वरील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांमध्ये, वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव या दोन्ही शाखांमधील अधिका-यांचा समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) याचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण (२)** या आदेशाव्दारे, ज्यांचे अधिक्रमण करण्यात आले आहे अशा आदेशांनुसार, कोणत्याही अधिका-याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा परिणाम म्हणून जी कार्यवाही चालू असेल अशा कोणत्याही कार्यवाहीवर या आदेशातील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

(सै.वा.हु.नकवी)
मुख्य वन्यजीव रक्षक,
महाराष्ट्र राज्य.

## परिशिष्ट-४
## वन्यजीव गुन्हयाबाबत माहिती प्रपत्र

| अ.क्र. | घटना | घटनेचा तपशिल |
|---|---|---|
| १. | घटनेची<br>अ. तारीख<br>ब. स्थळ<br>क. वेळ | |
| २. | घटनेच्या खबरीबद्दलचा तपशिल<br>अ) खबर कुणी दिली<br>ब) किती वाजता दिली<br>क) कर्मचारी घटनास्थळी केव्हा पोहोचले.<br>ड) गुन्हयाचे ठिकाण | |
| ३. | वनगुन्हा नोंद<br>अ) प्राथमिक गुन्हा क्र. व दि.<br>ब) स्थळ<br>क) वेळ<br>ड) गुन्हयात लावलेले कलम | |
| ४. | तक्रार करणा-याचे नांव व पत्ता | |
| ५. | आरोपीची नांवे. | |
| ६. | गुन्हा तपास अधिका-याचे नांव व हुददा | |
| ७. | आरोपी विरुध्द केलेली कार्यवाही<br>अ) अटक केल्याचा दिनांक<br>ब) आरोपपत्र पाठविल्याचे दिनांक व न्यायालयाने नांव व पत्ता | |
| ८. | आरोपी पोलीस कोठडीत आहेत किंवा न्यायालयीन कोठडीत आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | अ) पोलीस कोठडीत (दिवस)<br>ब) न्यायालयीन कोठडीत (दिवस)<br>क) आरोपी जामिनावर सुटलेत काय व केव्हा पासून.<br>ड) असल्यास जामिन कोणी मंजूर केला. | |
| ९. | आरोपीकडून हस्तगत केलेल्या मालमत्तेचा तपशिल | |
| १०. | जप्त केलेल्या मालाची विल्हेवाट<br>अ) बंध पत्रावर सोडण्यात आलेला माल<br>ब) सध्या ताब्यात असलेला माल | |
| ११. | शासकीय कर्मचारी आरोपी असल्यास त्याचे विरुध्द केलेली कार्यवाही | |
| १२. | अशा प्रकारची घटना घडू नये म्हणून करण्यात आलेली उपाययोजना | |
| १३. | गुन्हयाची सद्य:स्थिती<br>(न्यायालयीन प्रकरणे इत्यादी.) | |